महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/ 1763 /2022-23. दिनांक: 22/08/2022

प्रति,

कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग,
पेण रायगड पिन नं.402 107.

विषयः- **वन जमिन रायगड**

पेण - खोपोली - महड (0.000 कि.मी ते 33.329 कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-166 डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्ताव ...

संदर्भः- 1) आपले कडील पत्र क्र. रामवि/पेण/प्रशा 5/पेण खोपोली/2106, दि. 08/10/2020
2) या कार्यालयाकडील पत्र क्र.ब/20/जमीन/2154, दि.25/11/2020
3) आपले कडील पत्र क्र.NHD/Pen/PKM/Forest/PB-5/2409 Date-23/11/2020.
4) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/2732, दिनांक 24/12/2020.
5) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/835, दि. 23/04/2021.
6) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/569, दिनांक 24/05/2021.
7) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र. ब/20/जमिन/वसं/757, दिनांक 03/06/2021.
8) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/1111, दि. 17/06/2021.
9) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र. ब/20/जमिन/वसं/1299, दिनांक 10/07/2021.
10) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/PKM/Forest/PB-5/1842, दि. 21/10/2021.
11) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/4290, दिनांक 28/01/2022.
12) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/Forest/PB-5/488, दि. 25/03/2022.
13) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/1327, दिनांक 06/07/2022.
14) आपले कडील पत्र क्र. NHD/Pen/Forest/PB-5/1236, दि. 21/07/2022.

पेण - खोपोली - महड (0.000 कि.मी ते 33.329 कि.मी.) सेक्शन ऑफ एनएच-166 डी मधील रस्त्याचे रुंदीकरणाकरीता वनजमिन मागणी प्रस्तावात आपणाकडील संदर्भिय पत्र क्र. 14 अन्वये पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करणेत आलेला आहे.

सदर प्रस्तावची छाननी केली असता त्यामध्ये अद्याप देखील खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1. प्रस्तावांतील गाव नकाशामध्ये त्या गावांतील सर्व प्रकारचे वनक्षेत्र जसे राखीव वन, संरक्षीत वन, अंतिमत: संपादीत वन, खाजगी वन (चौकशीवर प्रलंबित/ पुन:स्थापीत) विहित रंगसंगतीने दर्शविणेबाबत यापूर्वीचे त्रुटी पत्रामध्ये आपणास कळविण्यात आलेले होते. तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही. राखीव वन हिरव्यारंगाने व संरक्षीत वन पिवळया रंगाने, अंतीमत: संपादित वन गुलाबी रंगाने दर्शविणे आवश्यक आहे.

2. मौजे आपटी संरक्षीत वन सर्व्हे नंबर 8 दर्शविलेला नाही. मौजे डोणवत संरक्षीत वन सर्व्हे नंबर 32 दर्शविलेला नाही. मौजे तांबाटी राखीव वन दर्शविलेले नाही. मौजे दहिवली तर्फे बोरेटी संरक्षीत वन सर्व्हे नंबर 4 दर्शविलेले नाही. मौजे रामराज येथील संपादित वन दर्शविलेले नाही. मौजे आंबेघर येथील राखीव वनाचे क्षेत्र दर्शविलेले नाही.

3. गाव नकाशावरील क्षेत्र विवरण तक्ता विहित पत्रपत्रांत दिलेला नाही. तसचे आखणी मार्गातील गट नंबर चे जुने सर्व्हे नंबर नमुद केलेले नाहीत, तसेच राखीव वनाचे कंपार्टमेंट नंबर नमुद केलेले नाहीत. याबाबत यापुर्वीचे त्रुटी पत्रांत सूचना देण्यात आलेल्या होत्या तथापी त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही.

3. तसेच या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. 13 मधील त्रुटी क्रमांक 17, 18, 21 व 22 ची पूर्तता करण्यात आलेली नाही. तरी सदर त्रुटींची परिपूर्ण पूर्तता करणेत यावी.

एकूण एकंदरीत वारंवार असे निदर्शनास येत आहे की, प्रस्तांवात परिपूर्ण त्रुटींची पूर्तता न करताच प्रस्ताव फेर या कार्यालयास सादर केलेला दिसून येत आहे. तरी परिपूर्ण व त्रुटी रहित प्रस्ताव सादर केला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणे करुन त्याच त्याच त्रुटी प्रस्तावांत उपस्थित होऊन आपले कार्यालयाचा व या कार्यालयाचा वेळ वाया जाणार नाही.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन प्रस्तावाचा संचा तयार करुन या कार्यालयास सादर करणेची कार्यवाही करावी. तसेच ज्या ज्या वन परिक्षेत्रांतून सदर रस्ता जाणार आहे त्या त्या वन परिक्षेत्र अधिकारी यांना त्यांचे परिक्षेत्रांतील आखणी मार्गाची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत आपणास यापूर्वीच सूचित केलेले आहे. जेणेकरुन त्यांना त्यांचे वनक्षेत्रांत बाधीत होणा-या वृक्षांचे तोडीचे अंदाजपत्रक तयार करुन ते या कार्यालयास सादर करणे शक्य होईल.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रत:- सहा. वनसंरक्षक, पनवेल व अलिबाग यांचेकडे माहितीसाठी रवाना.

प्रत:- वन परिक्षेत्र अधिकारी, पेण व खालापूर यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी उक्त प्रस्तावांमध्ये प्रकल्प यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचा वनभंग झाला आहे किंवा कसे? याबाबत खात्री करुन अहवाल सादर करावा. तसेच प्रस्तांवातील वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे किंवा कसे? याबाबत खात्री करुन वृक्षतोड होणार असेल तर त्याबाबत वृक्षतोडीचे अंदाजपत्रक तयार करुन या कार्यालयास सादर करावा. तसेच प्रस्तूत प्रस्तावांत पर्यायी वनीकरणाकरीता दुप्पट अवनत वनक्षेत्र प्रस्तावीत करुन त्याचे नकाशे, पर्यायी वनीकरणाची योजना, क्षेत्र वनीकरणाकरीता सुयोग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी

प्रत:- सर्व्हे कक्ष यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.